महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ 2 मे 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 303 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# ‘देवाभाऊ’ चष्म्याच्या रुपात महाराष्ट्राचा जगभरात डंका

## अमेरिकेसह जगभरात अवघ्या ३३ रुपयांत मिळणार मेड इन इंडिया ‘देवाभाऊ’ चष्मा




दै. ठाणे जीवनदीप वार्ता.

महाराष्ट्र दिनी 'देवाभाऊ' चष्म्याच्या रुपात महाराष्ट्राचा जगभरात डंकाअमेरिकेसह जगभरात अवघ्या 33 रुपयांत मिळणार मेड इन इंडिया 'देवाभाऊ' चष्मा काठमांडूतील जागतिक परिषदेत सर्वात स्वस्त चष्म्यावर शिक्कामोर्तब140 देशांच्या प्रतिनिधींकडून 'देवाभाऊ' चष्म्यांचे कौतुकAnchor - नेपाळच्या काठमांडूत पार पडलेल्या जागतिक परिषदेत बदलापूरच्या 'देवाभाऊ' चष्म्यावर जगातील सर्वात स्वस्त चष्मा म्हणून शिक्कामोर्तब झालय. महाराष्ट्र दिनाच्या दिवशीच 'देवाभाऊ' चष्म्याच्या रूपात जगाला मोठी भेट मिळालीय. या परिषदेत बदलापूरच्या व्हिजन फ्रेंड साकिब गोरे या सामाजिक संस्थेनं सादर केलेला 33 रुपयांतील 'देवाभाऊ' चष्मा आता अमेरिकेसह 140 देशांमध्ये पोहोचणार आहे. अंधत्व निवारण मोहिमेअंतर्गत डब्ल्यूएचओच्या मार्गदर्शनाखाली नेपाळच्या काठमांडूत आयएपीबी अर्थात जागतिक अंधत्व निवारण संस्थेमार्फत तीन दिवसीय शिखर परिषदेचं आयोजन करण्यात आलं होतं.

या परिषदेला 140 देशांचे 700 हून अधिक प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेत बदलापूरच्या व्हिजन फ्रेंड साकिब गोरे या सामाजिक संस्थेनं सादर केलेला 33 रुपयांतील सर्वात स्वस्त चष्मा चर्चेचा विषय ठरला. परिषदेसाठी आलेल्या सर्वांसाठीच हा चष्मा कुतुहलाचा विषय होता. त्यांनी व्हिजन फ्रेंड साकिब गोरे यांच्या स्टॉलला भेट दिली, तसच किंमत ऐकून आश्चर्य देखील व्यक्त केलं. आयएबीपीच्या अध्यक्षा कॅरोलीन केसी, सीईओ पीटर हॉलंड, युनायटेड नेशन्सचे ॲम्बेसिडर वेबसन, डब्ल्यूएचओचे स्टुअर्ड किल आणि इतर मान्यवरांनीही स्टॉलला भेट देऊन हा जगातील सर्वात स्वस्त चष्मा असल्यावर शिक्कामोर्तब केलं. सध्याच्या घडीला जगभरात 1.1 अब्ज लोक चष्म्यापासून वंचित आहेत. यात आफ्रिकन देशांसोबत अमेरिकेचाही समावेश आहे. जगातील तळागाळातल्या लोकांपर्यंत हा चष्मा पोहचावा या उद्देशानं साकिब गोरे यांनी संपूर्ण भारतीय बनावटीचा चष्मा बनवला आहे. व्हिजन फ्रेंड साकिब गोरे या संस्थेने 33 रुपयांपासून 260 रुपयांपर्यंत देवाभाऊ चष्म्याची सीरिज बनवली आहे. बदलापूर दौऱ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर सभेत या चष्म्याचं कौतुक केलं होतं. आता काठमांडूतल्या समीटनंतर अमेरिका, आफ्रिकन खंडातील देश, फिलिपाईन्स, सिंगापूर, इथिओपिया, दक्षिण कोरिया, आशियाई तसंच आखाती देशांसह जवळपास 140 देशांमध्ये 0.38 डॉलर म्हणजेच 33 रुपयांतील चष्मा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झालाय. यानिमित्तानं बदलापूरसह महाराष्ट्राचा डंका जगभरात वाजणार आहे.

### काठमांडूतील जागतिक परिषदेत सर्वात स्वस्त चष्म्यावर शिक्कामोर्तब

### १४० देशांच्या प्रतिनिधींकडून ‘देवाभाऊ’ चष्म्यांचे कौतुक

## कार्यालयीन मूल्यमापन मोहिमेत ठाणे जिल्हा परिषद राज्यात प्रथम

*मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे कौतुकास्पद नेतृत्व*



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**दि. १ मे - ठाणे** - महाराष्ट्र शासन व भारतीय गुणवत्तापरिषद (QCI) यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या ‘कार्यालयीन मूल्यमापन - 100 दिवसांचा कृती कार्यक्रम आराखडा’ अंतर्गत जिल्हा परिषद, ठाणे राज्यभरातून प्रथम क्रमांकावर आली आहे.

या मोहिमेअंतर्गत शासकीय कार्यालयांचे कामकाज, कार्यक्षमता, पारदर्शकता, जनतेशी संवाद साधणे, जनतेस वेळेवर सेवा देणे आदी विविध घटकांवर आधारित मूल्यांकन करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासनातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे कामकाजात गुणात्मक सुधारणा घडवुन आणली आहे. यामध्ये विशेष प्रयत्नशिल राहणारे उप मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे यांचाही सहभाग महत्त्वाचा आहे. जिल्हा परिषद, ठाणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली कार्यालयाने ९२.०० गुणांसह राज्यात सर्वोच्च स्थान पटकावले.

"या यशाचे खरे श्रेय जिल्हा परिषद ठाणेच्या प्रत्येक अधिकाऱ्याचे व कर्मचाऱ्याचे आहे. वेळोवेळी वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले आहे. मा. मुख्यमंत्री तसेच मा. उपमुख्यमंत्री महोदयांच्या अपेक्षित लोकाभिमुख, गतिमान, पारदर्शक प्रशासन तयार करण्यासाठी त्या १०० दिवसांमध्ये विशेष प्रयत्न करण्यात आले व अशाच प्रकारे यापुढेही काम अविरत सुरू राहील व नागरिकांना मिळणाऱ्या सेवांची गुणवत्ता वाढविण्यासाठी जिल्हा परिषद सदैव प्रयत्नशील राहील." – जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे

या उल्लेखनीय यशामुळे ठाणे जिल्ह्यातील प्रशासनाच्या कार्यक्षमतेस मान्यता लाभली आहे. ही उपलब्धी जिल्हा परिषद ठाणेच्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे व निष्ठेचे फलित आहे.

शासनाच्या कार्यपद्धतीत सकारात्मक बदल घडवून आणणाऱ्या आणि लोकाभिमुख प्रशासनासाठी समर्पित असलेल्या ठाणे जिल्हा परिषदेचे अभिनंदन करण्यात येत आहे. हा सन्मान भविष्यातील जिल्हा परिषदेच्या कामकाजात अधिक गुणवत्ता व पारदर्शकता साधण्यासाठी प्रेरणादायक ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# महाराष्ट्राच्या विकासात मनोरंजन क्षेत्राची भूमिका महत्त्वाची - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता.

मुंबई, दि. ०१ : महाराष्ट्राच्या विकासात विविध क्षेत्रे आपला सहभाग देत आहेत. येत्या काळात महाराष्ट्राच्या विकासात मनोरंजन क्षेत्राची भूमिका महत्वाची ठरणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एन्टरटेन्मेंट समिट २०२५ अर्थात वेव्हज् परिषदेचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेंशन सेंटर मध्ये झालेल्या या कार्यक्रमात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, रेल्वे, माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस.जयशंकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, माहिती प्रसारण राज्यमंत्री डॉ.एल.मुरुगन यांच्यासह देशविदेशातील मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ५०० एकरमध्ये असलेल्या मुंबईतील चित्रपटनगरीत ॲनिमेशन, गेमिंग आणि व्हिज्युअल इफेक्ट्ससाठी खास १२० एकरमध्ये मीडिया ॲण्ड एंटरटेनमेंट सिटीची उभारणी होणार आहे. हे दोन्ही प्रकल्प आगामी काही महिन्यांत प्रत्यक्षात येणार आहेत.

या वेव्हज् परिषदेद्वारे भारताने क्रिएटिव्ह क्षेत्रात आघाडीवर असल्याचे दाखविले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने आर्थिक महासत्ता म्हणून ओळख निर्माण केली असून, आता भारत क्रिएटिव्ह क्षेत्रातही नेतृत्व करण्यासाठी सज्ज आहे, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. माहिती तंत्रज्ञान, कौशल्य आणि क्षमता ही महाराष्ट्राची बलस्थाने आहेत, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी भारताच्या नव्या ‘क्रिएटिव्ह वेव्हज’चे स्वागत करण्याचे आवाहन केले.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे / दि.01 :** ठाणे जिल्ह्याच्या चौफेर प्रगती आणि सर्वांगीण सामाजिक विकासासाठी आपले महाराष्ट्र सरकार कटिबद्ध आहे. आज महाराष्ट्र दिनी पुन्हा एकदा राज्याच्या प्रगतीचा, भरीव विकास आणि कल्याणकारी योजनांचा संकल्प आपण करत आहोत, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे यांनी आज येथे केले. महाराष्ट्र राज्याच्या 66 व्या स्थापना दिनानिमित्त ठाणे जिल्ह्यातील मुख्य शासकीय ध्वजवंदन उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे यांच्या हस्ते पोलीस क्रीडा संकुल, साकेत मैदान, ठाणे येथे संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते.

# जिल्ह्याच्या ठिकाणीच रूग्णांना मदत

## जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन






दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. २९ :** राज्यातील आर्थिकदृष्ट्या गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य करण्याकरिता राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात ‘मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष’ सुरू करण्यात यावेत असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते, त्यानुसार या कक्षाचे 1 मे रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून पालकमंत्री / मंत्री/ राज्यमंत्री यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार असल्याचे कक्षप्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

राज्यातील गरजू रूग्णांना उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून आर्थिक मदत पुरवली जाते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्यासंदर्भात २२ फेब्रुवारी २०२५ रोजी शासन निर्णय काढण्यात आला. शिवाय, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाची २३ एप्रिल रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली होती, या बैठकीत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष पुर्ण क्षमतेने कार्यान्वयित करणेबाबत निर्देश दिले होते.

वैद्यकीय उपचासाठी मदत मिळावी याकरिता गरजू रूग्ण व त्यांचे नातेवाईक मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडे मोठ्या प्रमाणात अर्ज करत असतात. अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी ते मंत्रालयात वारंवार येतात. रूग्ण व नातेवाईकांना होणारा त्रास लक्षात घेवून मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दुरदृष्टीतून रूग्ण व नातेवाईकांची परवड थांबविण्याच्या उद्देशातून सदरचा कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

### रूग्ण व नातेवाईकांना होणार कक्षाचे फायदे

- रूग्ण व नातेवाईकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाला अर्ज करण्याकरिता मदत मिळणार.
- अर्जासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी, माहिती सहज उपलब्ध होणार.
- संलग्न असणाऱ्या रूग्णालयांची यादी मिळणार.
- अर्ज किंवा पाठपुरावा करण्यासाठी मंत्रालयात जाण्याची गरज नाही.
- अर्जाची स्थिती जिल्हाधिकारी कार्यालयात समजणार

### काय असणार कक्षाची जबाबदारी

- अर्ज करण्यासाठी रूग्ण व नातेवाईकांना मदत करणे.
- प्राप्त अर्जांची सद्यस्थिती उपलब्ध करुन देणे.
- रूग्ण व नातेवाईकांच्या समस्यांचे निराकरण करणे.
- आर्थिक मदत झालेल्या रुग्णांची रुग्णालयात जाऊन भेट घेणे.
- नागरिकांमध्ये कक्षा बाबत जनजागृती आणि प्रसिध्दी करणे.
- कक्षामार्फत अर्थसहाय्य देण्याकरिता आजारांचे पुनर्विलोकन करणे.
- जिल्ह्यातील आपत्तीच्या ठिकाणी भेटी देणे.
- मुख्यमंत्री सहाय्यता निधीला अधिकाधिक देणग्यांचा ओघ येण्याकरिता प्रयत्न करणे.
- अर्थसहाय्य देण्यात येणाऱ्या आजारांच्या संख्येत वाढ करण्यासाठी प्रयत्न करणे.

## कृषी उत्पन्न बाजार समिती अमली पदार्थांचा अड्डा

### माथाडी नेते नरेंद्र पाटील यांचा आरोप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** अमली पदार्थ विक्रीची साखळी उद्ध्वस्त व्हावी यासाठी नवी मुंबई पोलिसांनी गेल्यावर्षभरात वेगवेगळ्या मोहीमा आखल्या असल्या तरी मुंबई महानगर प्रदेशात कृषी मालाचा पुरवठा करणाऱ्या वाशीतील सर्वात मोठ्या बाजारपेठांमध्ये अमली पदार्थ विक्रीची मोठी साखळी कार्यरत असल्याचा आरोप बुधवारी या भागात कार्यरत असलेल्या माथाडी नेत्यांनी केला. कृषी मालाच्या पाचही बाजारपेठांमध्ये अवैध धंदे फोफावले आहेत आणि ते रोखण्यात पोलीस यंत्रणा कुचकामी ठरली आहे, असा गंभीर आरोप माथाडी नेते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय नरेंद्र पाटील यांनी पत्रकार परिषदेत केला.

याबाजारपेठांमध्ये विदेशातून येणाऱ्या मालाची कोणतीही तपासणी केली जात नाही, या कृषी मालासोबत आणखी काय येते यावर कोणाचेही नियंत्रण नाही. तसेच बाजारपेठांमध्ये फोफावलेल्या गुंडगिरीमध्ये स्थानिक पोलीस दुर्लक्ष करत आहे असा आरोपही नरेंद्र पाटील यांनी केला. या बाजारांमध्ये अमली पदार्थ खरेदी विक्रीचे अनेक अड्डे आहेत, या ठिकाणी मोठ्याप्रमाणात बांगलादेशींचे वास्तव्य आहे. हे बेकायदा धंदे बंद करण्यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तांनी येथे विशेष पोलीस पथकाची स्थापना करावी अशी मागणीही नरेंद्र पाटील यांनी यावेळी केली.

माथाडी कामगारांची संघटना स्थापन करून याद्वारे गुंडगिरी केली जात आहे. या गुंड नेत्यांमुळे माथाडी चळवळ बदनाम केली जात आहे. माथाडी कामगारांच्या नावाने संघटना स्थापन करुन गुंडगिरी करणाऱ्यांवर नियंत्रण आणणारा कायदा करावा अशी मागणीही पाटील यांनी यावेळी केली.




# ठाणे जिल्हा परिषदेत महाराष्ट्र दिन साजरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** दि.०१ जिल्हा परिषद - महाराष्ट्र दिनाच्या ६६ वा वर्धापन दिनानिमित्त वागळे इस्टेट येथील जिल्हा परिषद ठाणे इमारतीच्या आवारात प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे रोहन घुगे यांच्या शुभहस्ते ध्वजवंदन करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रगीत व राज्यगीत गात सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ध्वजवंदन केले.

यावेळी प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र) अविनाश फडतरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) प्रमोद काळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) प्रकाश सासे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय बागुल, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ललीता दहितुले, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, उप कार्यकारी अभियंता सुनिल बच्छाव तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व अधिकारी व कर्मचारी यांना दिल्या. सामान्य प्रशासन विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी उत्तमरित्या कार्यक्रमाची तयारी केली होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अनिल सुर्यवंशी यांनी केले.





## गीतासार



### अध्याय १०
### विभूतियोगः

श्रीभगवानुवाच भूय एव महाबाहो श्रृणु मे परमं वचः । यत्तेऽहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया ॥ १०-१ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, हे महाबाहो अर्जुना, आणखीही माझे परम रहस्यमय आणि प्रभावयुक्त म्हणणे ऐक, जे मी अतिशय प्रेमी अशा तुला तुझ्या हितासाठी सांगणार आहे. ॥ १०-१ ॥

न मे विदुः सुरगणाः प्रभवं न महर्षयः । अहमादिर्हि देवानां महर्षीणां च सर्वशः ॥ १०-२ ॥

माझी उत्पत्ती अर्थात लीलेने प्रकट होणे ना देव जाणतात ना महर्षी. कारण मी सर्व प्रकारे देवांचे व महर्षींचे आदिकारण आहे. ॥ १०-२ ॥

यो मामजमनादिं च वेत्ति लोकमहेश्वरम् । असम्मूढः स मर्त्येषु सर्वपापैः प्रमुच्यते ॥ १०-३ ॥

जो मला वास्तविक जन्मरहित, अनादी आणि लोकांचा महान ईश्वर असे तत्त्वतः जाणतो, तो मनुष्यांत ज्ञानी असणारा सर्व पापांपासून मुक्त होतो. ॥ १०-३ ॥

बुद्धिर्ज्ञानमसम्मोहः क्षमा सत्यं दमः शमः । सुखं दुःखं भवोऽभावो भयं चाभयमेव च ॥ १०-४ ॥
अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशोऽयशः । भवन्ति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधाः ॥ १०-५ ॥

निर्णयशक्ती, यथार्थ ज्ञान, असंमूढता, क्षमा, सत्य, इंद्रियनिग्रह, मनोनिग्रह, सुख-दुःख, उत्पत्ति-प्रलय, भय-अभय, अहिंसा, समता, संतोष, तप, दान, कीर्ती-अपकीर्ती, असे हे भूतांचे अनेक प्रकारचे भाव माझ्यापासूनच होतात. ॥ १०-४, १०-५ ॥

## आरोग्य
### ओव्याचे पाणी पिण्याचे फायदे

**पचनसंस्था मजबूत करते**
चुकीच्या खाण्या-पिण्याच्या सवयीमुळे गॅस, अपचन आणि बद्धकोष्ठता यासारख्या पचनाच्या समस्या खूप सामान्य आहेत. ओव्या मध्ये पचन सुधारणारे घटक असतात. हे अन्न लवकर पचण्यास मदत करते आणि गॅस तयार होण्यास प्रतिबंध करते. ओव्याचे पाणी पिल्याने तुमच्या पोटातील उष्णता कमी होते आणि पचनसंस्था निरोगी राहते. विशेषतः जर तुम्ही रात्री जड अन्न खाल्ले तर झोपण्यापूर्वी ओव्याचे पाणी प्यायल्याने फायदे मिळतील.

**रक्तातील साखर नियंत्रित करते**
मधुमेह हा एक गंभीर आजार आहे जो हळूहळू शरीराच्या अनेक भागांवर परिणाम करतो. संशोधनानुसार, ओव्याचे पाणी रक्तातील साखर नियंत्रित करण्यास मदत करते. याच्या सेवनाने इन्सुलिनची पातळी संतुलित होते आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित होते. त्यामुळे रात्री झोपण्यापूर्वी ओव्याचे पाणी पिणे मधुमेही रुग्णांसाठी फायदेशीर ठरू शकते.

**त्वचेसाठी फायदेशीर**
ओव्यात अँटीऑक्सिडंट्स देखील आढळतात जे सुरकुत्या, डाग आणि कोरडेपणा यासारख्या त्वचेच्या समस्या दूर करण्यास मदत करतात. ओव्याचे पाणी नियमितपणे प्यायल्याने त्वचा आतून हायड्रेटेड आणि चमकदार राहते. हे शरीरातील हानिकारक विषारी पदार्थ काढून टाकण्यास देखील मदत करते, ज्यामुळे तुमची त्वचा निरोगी दिसते.

## तेथे कर माझे जुळती
# शहिद तेलंगा खडीया


भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासातील तेलंगा खाडिया हा ब्रिटिश राजवटी समोर न झुकणारा ,जुलूम व शोषणा विरुध्द रणशिंग फुंकणारा एक स्वाभिमानी, शेतकरी कुटुंबातील पण आदिवासी भागातील तरुणांना स्फूर्ती देणारा मार्गदर्शक आहे.तेलंगाचा जन्म९ फेब्रुवारी १८०६ रोजी गुमला जिल्ह्यातील मुर्गु गावी( आता चे झारखंड) झाला .त्यांच्या आई चे नाव पेतो आणि वडिलांचे नाव हुईया खादिया असे होते.

तेलंगा लहानपणापासूनच अतिशय विलक्षण प्रतिभेचा बुद्धिमान मुलगा होता. आपल्या मित्रांसह तो दैनंदिन व्यायाम करत असे. जंगलात जाऊन बाण आणि धनुष्य चालवणे ,कुस्त्या खेळणे, तलवारी चालवणे, लाठी चालवणे ,भालाफेक करणे इत्यादी मैदानी खेळ करण्यात ते पटाईत



( ९ फेब्रुवारी १८०६- २३ एप्रिल १८८० )

होते.तत्कालीन छोटा नागपूर क्षेत्रातील समाजरचना व ब्रिटिशांच्या धोरणाचा त्यांनी अभ्यास केला . तेव्हा त्यांच्या असे लक्षात आले की, भारतातील सर्वसामान्य लोकांवर ब्रिटिश आणि जमीनदारांकडून अत्याचार होत आहेत. या ब्रिटिशांना आणि त्यांच्या हस्तक जमीनदारांना धडा शिकवण्याचा त्यांनी आपल्या साथीदारांसोबत निश्चय केला .तेलंगा यांनी गुमला भागातील लोकांशी संपर्क साधला आणि त्यांना ब्रिटिशांचे विरोधात लढण्याची प्रेरणा दिली. ब्रिटिश पोलिसांनी तेलंगाच्या कुटुंबाचा छळ सुरू केला. पोलीस अधिकारी त्यांच्यावर चाबकाचे फटके मारत. एके दिवशी बसियाच्या कुम्हारी गावात तेलंगाना त्याच्या साथीदारांसह अटक करण्यात आली .इंग्रजांनी तेलंगाना कोलकत्ता तुरुंगात पाठवले. काही वर्षांनी तुरुंगातून सुटून आपल्या घरी परतले. त्यावेळेस त्यांना असे दिसले की परिस्थिती ही पूर्वीपेक्षा जास्त बिघडलेली आहे ,कारण 1857 च्या अ पशामुळे इंग्रज खवळले होते. प्रशिक्षण प्रमुखः जोरी पंचायत संघटनेची स्थापना करून तेलंगाने आपल्या युवा संघटनेचे पुनरुज्जीवन केले. पंधराशे हुन अधिक युवकांना त्यांनी प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली .ते म्हणाले" आम्हाला इंग्रजांना हुसकून लावावे लागेल .भारत मातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करूनच आम्ही मरणार आहोत . जीव गमावला तरी आम्हाला आमच्या जीवाची पर्वा नाही .आम्हाला आमच्या प्रिय देशाला स्वतंत्र करायचे आहे" , असे तेलंगाने आवाहन केले. इंग्रजांना तेलंगा खडिया यांच्या कारवायांची माहिती मिळाली , तेव्हा त्यांनी बोधन सिंग या व्यक्तीला तेलंगाची हत्या करण्यास प्रवृत्त केले. भामट्या नी अपराधी बोधन सिंग याला ब्रिटिशांनी त्याकाळी ₹ ४०००/- प्रलोभन दिले होते.तेलंगा सिसाईच्या रिंगणात त्यांच्या समर्थकांना,प्रशिक्षणार्थींना दररोज प्रशिक्षण द्यायचे, हे बोधनसिंगला माहीत होते. प्रशिक्षण घेण्यापूर्वी तेलंगाने आपल्या साथीदारांसह इष्ट देव आणि पृथ्वी मातेची प्रार्थना आणि पूजा सुरू केली. नित्य नियमाप्रमाणे ते पूजा करीत असत . एके दिवशी तेलंगा आपल्या साथीदारांसह पृथ्वी मातेची पूजा करून हात जोडून प्रार्थना करत असताना तिथे अगोदरच लपून बसलेला देशद्रोही बोधनसिंग याने त्यांच्या छातीवर गोळ्या झाडल्या.तो दिवस होता 23 एप्रिल 1880 चा. सदर दिवशी तेलंगा खडिया गतप्राण झाले. गुमला जिल्ह्यातील चांदोली गावात त्यांची समाधी बांधली आहे. दरवर्षी त्यांच्या जन्मदिनी अर्थात नऊ फेब्रुवारी रोजी त्यांची जयंती ही साजरी केली जाते. महान स्वातंत्र्य सैनिक,निष्ठावान,श्रद्धावान व शूर लढवय्या नेत्यास ही विनम्र श्रद्धांजली!



डॉ. आनंदराव सूर्यवंशी

# रिक्षेत विसरलेली दागिन्यांची बॅग मानपाडा पोलिसांमुळे मिळाली परत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
डोंबिवली :लक्ष्मी गुप्ता या आपल्या परिवारासह 29 एप्रिल रोजी रिक्षातून प्रवास करताना त्यांची अडीच लाख रुपये किमतीची सोन्याची दागिने ठेवलेली बॅंग विसरले. रिक्षातून उतरल्या नंतर काही वेळाने आपण बॅंग विसल्याचे लक्षात आल्यावर गुप्ता यांनी मानपाडा पोलीस ठाण्यात माहिती दिली. मानपाडा पोलिस ठाण्याचे



वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकातील अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक संपत फडोळ व सहायक पोलीस उपनिरीक्षक गणेश भाबड यांनी तपास पथकातील पो. हवा. विकास माळी, पोलीस हेडकॉन्स्टेबल सुनील पवार, संजू मासाड, शिरीष पाटील, पोलीस शिपाई, अशोक आहेर, विजय आव्हाड, सोपान शेडके यांनी सिसिटीव्ही फुटेज तपासले. पोलिसांनी तपास करून रिक्षाचा शोध घेत विसरलेली दागिन्याची बॅग सुखरूप गुप्ता यांना परत मिळून दिली.

# पत्रकार विश्वास गायकवाड यांचा
## ‘प्रियदर्शी चक्रवर्ती सम्राट अशोक’ पुरस्काराने गौरव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
बोरघर : बुद्ध रत्नसागर सोशल वेल्फेअर फाऊंडेशन आणि आंतरराष्ट्रीय बौद्ध धम्म परिषद संयोजन समिती माणगांव आयोजित माणगांव येथील तिसऱ्या आंतरराष्ट्रीय धम्म परिषदेत माणगांव येथील जेष्ठ पत्रकार विश्वास बळीराम गायकवाड बोरघर, माणगांव रायगड यांच्या प्रामाणिक पत्रकारितेचा प्रियदर्शी चक्रवर्ती सम्राट अशोक या सर्वोच्च पुरस्काराने गोरव करण्यात आला.

रविवार दिनांक २७ एप्रिल रोजी बुद्ध रत्नसागर सोशल वेल्फेअर फाऊंडेशन आणि संयोजन समिती माणगांव च्या वतीने सदर बौद्ध धम्म परिषदेचे प्रमुख आयोजक भदंत रत्नप्रिय थेरो यांनी तिसऱ्या आंतरराष्ट्रीय बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन माणगांव निजामपूर रोड येथील गांधी हॉल या ठिकाणी करण्यात आले होते. सदर आंतरराष्ट्रीय बौद्ध धम्म परिषद भदंत शांती रत्न महा थेरो यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात



संपन्न झाली. सदर आंतरराष्ट्रीय बौद्ध धम्म परिषदेत विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र अस्थीकलशाची भव्य मिरवणूक काढण्यात आली, आणि सदर पवित्र अस्थीकलश धम्म परिषदेच्या ठिकाणी दर्शनासाठी ठेवण्यात आला होता.

बुद्ध रत्नसागर सोशल वेल्फेअर फाऊंडेशन आयोजित तिसऱ्या आंतरराष्ट्रीय बौद्ध धम्म परिषदेला मोठ्या संख्येने देश विदेशातील वंदनीय बौद्ध धम्म गुरू, भन्ते भिक्खू गण, समाजातील थोर दानशूर व्यक्ती, बौद्ध धम्म उपासक आणि उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या तिसऱ्या आंतरराष्ट्रीय बौद्ध धम्म परिषदेत बोरघर, माणगांव येथील पत्रकार विश्वास बळीराम गायकवाड यांच्या प्रामाणिक पत्रकारितेचा प्रियदर्शी चक्रवर्ती सम्राट अशोक या सर्वोच्च पुरस्काराने गौरव करण्यात आला. सदर सर्वोच्च पुरस्कार सदर आंतरराष्ट्रीय बौद्ध धम्म परिषदेचे प्रमुख आयोजक वंदनीय भदंत रत्नप्रिय थेरो, अध्यक्ष वंदनीय भदंत शांती रत्न महा थेरो श्रीलंकेचे वंदनीय भदंत धम्म गुरू आणि अन्य बौद्ध भिक्खू गण यांच्या हस्ते पत्रकार विश्वास बळीराम गायकवाड यांना पुष्प गुच्छ आणि सन्मान पत्र देऊन सन्मानपूर्वक गौरवण्यात आले.

# महाराष्ट्र दिनी मुरबाड तहसिल कार्यालयात आ.किसन कथोरेंच्या हस्ते ध्वजारोहण!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड : 1 मे महाराष्ट्र दिन म्हणजेच कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. मुरबाड तहसिल कार्यालयाच्या प्रांगणात दरवर्षी प्रमाणे आमदार कथोरेंच्या हस्ते ध्वज फडकविण्यात आला.यावेळी मुरबाड पोलीसांच्या वतीने झेंड्याला मान वंदना देण्यात आली. तदनंतर मुरबाड तहसिलदार यांच्या वतीने स्वातंत्र्य सैनिकांच्या नातेवाईकांचा सत्कार करण्यात आला. तसेच महसूल विभागातील सेवा निवृत्त कर्मचारी तातू ठाकरे यांचाही विशेष सन्मान कथोरेंच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी आमदार कथोरे यांनी



मार्गदर्शन करताना विकासाच्या अनेक मुद्द्यांना स्पर्श केला. आजच्या दिवशी मुरबाड शहरासह तालुक्यातील सर्व कामगारांची नोंदणी करण्याचे महत्वाचे काम करण्याचे आवाहन कामगार दिनी केले असून त्याचा लाभ कामगारांना मिळणार आहे. याजबरोबर माळशेज घाटातील बहुचर्चित काचेचा स्काय वॉकला वित्त विभागाची मंजुरी मिळाली असल्याने मुरबाडचे नाव जगाच्या पटलावर झळकणार आहे. समृद्धी महामार्ग, वडोदरा एक्सप्रेस,कल्याण -मालशेज हायवे यांच्यामुळे मुरबाडचे दळणवळण वाढणार असून भविष्यात तरूणांच्या हाताला काम देण्यासाठी नविन एम.आय.डी.सी.लवकरच आणण्याचे प्रयत्न चालू आहेत.

या ध्वजारोहनासाठी तहसीलदार अभिजीत देशमुख, मुख्याधिकारी मनोज म्हसे,यांच्या सह तालुक्यातील राजकीय, सामाजिक, शालेय विद्यार्थी,महसूल चे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

तर मुरबाड शहरातील सरकारी कार्यालये, शाळा, महाविद्यालयातही ध्वजारोहण करण्यात आले. मुरबाड नगरपंचायत कार्यालया समोर मुरबाड नगरपंचायत च्या वतीने सकाळी 7.वा.ध्वज फडकविण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्षा, मुख्याधिकारी, सर्व नगरसेवक, नगरपंचायत चे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# वाजपेयी चौक-बल्याणी रस्त्यावर जीव घेणे खड्डे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
टिटवाळा : वाजपेयी चौक ते बल्याणीकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर गेल्या अनेक दिवसांपासून खोल खड्डा वाहतुकीस गंभीर धोका निर्माण करत आहे. वाहनचालक आणि पादचाऱ्यांसाठी हा रस्ता म्हणजे जीवघेणा प्रवास ठरत असून, कल्याण डोंबिवली महापालिका प्रशासन मात्र केवळ बघ्याची भूमिका घेत आहे. या धोकादायक परिस्थितीमुळे अपघातांची संख्या वाढत असून नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.

या ठिकाणी असलेला खड्डा इतका खोल व विस्तारलेला आहे की, दोन चाकी आणि चार चाकी वाहनांना तो टाळताना मोठा धोका पत्करावा लागतो. विशेषतः रात्रीच्या वेळी आणि पावसात हा खड्डा अधिक धोकादायक बनतो. स्थानिक



नागरिकांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. केवळ माती व पातळ डांबराचा थर देऊन केलेली दुरुस्ती काहीच तासात उधळून लागली. परिणामी खड्डा पुन्हा उघडाच पडला असून, रस्त्याची समांतरता बिघडली आहे.

या प्रकारामुळे महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या कार्यक्षमतेवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. सध्या महापालिकेवर प्रशासकीय राजवट असल्याने निवडून आलेले प्रतिनिधी नाहीत. याचा परिणाम प्रशासनाच्या उत्तरदायित्वावर होत असून, संबंधित अधिकारी, अभियंते मनमानीपणे काम करत आहेत. याचा बळी ठरत आहे सामान्य नागरिक.

अलीकडेच एका दुचाकीस्वाराचा अपघात याच ठिकाणी झाला. सुदैवाने प्राणहानी टळली, पण अशा अपघातांची मालिका सुरुच आहे. नागरिकांनी संताप व्यक्त करत म्हटलं, "दररोज आम्ही या रस्त्यावरून जीव मुठीत धरून जातो. खड्डा टाळताना अपघात होण्याची वेळ येते. प्रशासन नेमकं कधी जागं होणार?"

संबंधित अधिकाऱ्यांकडून 'पाईपलाईन गळतीमुळे खड्डा भरता आला नाही' असा प्रकारचा खुलासा करण्यात आला असला तरी, नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही कारणे पुरेशी नाहीत. नागरिक आता ठोस कृतीची मागणी करत असून, या खड्ड्याचे तातडीने योग्य पद्धतीने दुरुस्ती न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देत आहेत. हा खड्डा म्हणजे केवळ एका रस्त्यावरील तुटलेली जागा नाही, तर तो स्थानिक प्रशासनाच्या बेजबाबदारपणाचे आणि निष्काळजी कारभाराचे जिवंत प्रतीक बनला आहे. या संदर्भात संबंधित विभागाचे इंजिनिअर हरुण इनामदार यांना फोन द्वारे संपर्क केला असता त्यांनी फोन उचलला नाही.

# व्यापारी मंडळाच्या वतीने मोफत पाणी व रोझसिरप वाटप




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
वासिंद : महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त येथील व्यापारी मंडळाच्या वतीने मोफत पाणी व रोझसिरप वाटप करण्यात आले.

वासिंद व्यापारी मंडळाच्या वतीने अनेक उपक्रम राबविले जात असताना 1 मे या महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त शहरातील पूर्व-पश्चिम या दोन्ही बाजूला ग्राहक व नागरीकांसाठी मोफत पाणी व रोझसिरप वाटप करण्यात आले. तसेच या कार्यक्रमास्थळी भेट दिलेल्या राजकीय, सामाजिक पदाधिकारी, कार्यकर्ते यांचा असलेल्या वाढदिवसानिमित्त व्यापारी मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

सकाळी 10 ते दुपारी 1 वाजेपर्यंत हा उपक्रम राबविण्यात आला. तर सध्या उन्हाचा पारा असल्याने ये-जा करणाऱ्या ग्राहक व नागरीकांना पाणी व रोजसिरप मिळाल्याने समाधान व्यक्त केले. यासाठी व्यापारी मंडळाचे पदाधिकारी व सदस्य यांनी परिश्रम हाती घेतले होते.

# महाराष्ट्र दिनानिमित्त शहापूर वनविभागातील गुणवंत कर्मचाऱ्यांचा सन्मान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
शहापूर :महाराष्ट्र दिनानिमित्त शहापूर प्रादेशिक विभागातील वनविभागाच्या कार्यालयात एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उप वनसंरक्षक, शहापूर (प्रादेशिक) श्री. दीपेश मल्होत्रा (भा.व.से.) यांच्या शुभहस्ते विभागातील वर्ग तीन व चार मधील उत्कृष्ट आणि गुणवंत कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. या कर्मचाऱ्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत त्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. या प्रेरणादायी सोहळयाला



वनविभागातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यामध्ये शहापूरचे सहाय्यक वनसंरक्षक अभिजीत पिंगळे, कार्यालय अधीक्षक अक्षदा पाटील यांच्यासह वनपरिक्षेत्र अधिकारी आणि इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आवर्जून उपस्थिती दर्शविली. श्री.मल्होत्रा यांनी आपल्या मनोगतातून सर्व सन्मानित कर्मचाऱ्यांच्या कामाचे कौतुक केले आणि त्यांच्या योगदानाला उजाळा दिला. त्यांनी सांगितले की, या कर्मचाऱ्यांच्या समर्पित वृत्तीमुळेच विभागाचे कार्य अधिक प्रभावीपणे पार पडते. तसेच, इतरांनाही यातून प्रेरणा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रथम क्रमांकः लेखापाल जितेंद्र वाघ, द्वितीय क्रमांकः मुख्य लेखापाल अजयकुमार सांगळे व तृतीय क्रमांकः प्रशांत मेंगाळ यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.या सन्मान सोहळ्यामुळे कार्यालयातील कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. आपल्या कामाची दखल घेतली गेल्याने कर्मचाऱ्यांनी अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाली, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.







# ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकारी अशोक शिनगारेंच्या हस्ते ध्वजवंदन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे : महाराष्ट्र राज्याच्या 66 व्या स्थापना दिनानिमित्त ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते ध्वजवंदन संपन्न झाले.

यावेळी अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदिप माने, उपजिल्हाधिकारी सर्जेराव म्हस्के पाटील, प्र.उपजिल्हाधिकारी (सर्वसाधारण) सचिन चौधर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, प्रांताधिकारी उर्मिला पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख बाबासाहेब रेडेकर, जिल्हा हिवताप नियंत्रण अधिकारी डॉ.संतोषी शिंदे, तहसिलदार उमेश पाटील, रेवण लेंभे, डॉ.आसावरी संसारे, प्रदीप कुडाळ, उज्वला भगत, नायब तहसिलदार राहुल सूर्यवंशी, विठ्ठल दळवी, स्मितल यादव, जिल्हाधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.



# भारतामध्ये प्रथमच जपानी तंत्रज्ञानाचे 'हाय जॉ क्रशर' मशीन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा – भारतामध्ये प्रथमच जपानी तंत्रज्ञानाने सुसज्ज 'हाय जॉ क्रशर' हे अवजड यंत्र ठाणे जिल्ह्यातील गिरीराज कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या मालकीचे झाले आहे. महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाचे औचित्य साधून या यंत्राचे उद्घाटन नितीन चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. उद्घाटन सोहळ्यावेळी कंपनीचे सर्व कामगार उपस्थित होते. जपानमधून भारतात आलेले हे मशीन प्रथम चेन्नई येथे पोहोचले. तेथे त्याचे सुटे भाग एकत्र करण्यात आले. त्यानंतर हे यंत्र ठाण्यात आणण्यात आले आणि कल्याण येथे त्याची अंतिम जोडणी पूर्ण झाली. अत्याधुनिक तंत्रज्ञानात अग्रणी असलेल्या जपानने जगभरात नाव कमावले असून, कमी वेळेत आणि कमी श्रमात मोठी कामगिरी करणारी ही यंत्रणा त्याचेच प्रतिक आहे.**

## 'हाय जॉ क्रशर' मशीनची वैशिष्ट्ये

जपानमधील कोबेल्को कंपनीने तयार केलेले हे 'हाय जॉ क्रशर' मशीन 350 एचपी क्षमतेच्या इंजिनसह सुसज्ज आहे. याच्या साह्याने बाराव्या मजल्यापर्यंत सहज पोहोचता येते आणि धोकादायक इमारती, जुने जलकुंभ तसेच अनधिकृत इमारती काही वेळातच जमीनदोस्त करता येतात.

ही यंत्रणा सध्या कल्याण-डोंबिवली महापालिका, उल्हासनगर महापालिका व पनवेल महापालिका हद्दीतील धोकादायक व अनधिकृत बांधकाम हटविण्याच्या कामासाठी वापरली जात आहे. गिरीराज कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या कंपनीला अधिकृत ठेकेदार म्हणून नेमण्यात आले आहे.

या यंत्रात चार सीसीटीव्ही कॅमेरे व चालकासाठी ४० अंशांपर्यंत फिरणारे सुरक्षित कॅबिन बसवले आहे. दिवस-रात्र ३५ मीटर म्हणजेच सुमारे १२ मजल्यांपर्यंत काम करण्याची क्षमता या मशीनला आहे.



■ ठाण्यातील गिरीराज कन्स्ट्रक्शन कंपनीची क्रांतिकारी पावले

■ धोकादायक इमारती, अनधिकृत बांधकाम १२ व्या मजल्यापर्यंत करता येईल कारवाई

यापूर्वी महापालिकांमध्ये सात मजल्यांपर्यंतच पाडकाम शक्य होते; परंतु या आधुनिक यंत्राच्या साह्याने आता बाराव्या मजल्यापर्यंतचे काम शक्य झाले आहे. चालकाच्या सुरक्षिततेसाठी सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

या क्रांतिकारी मशीनच्या वापरामुळे शासकीय पातळीवर वेळ आणि मनुष्यबळाची मोठी बचत होणार असून, शहरी भागातील अनधिकृत व धोकादायक बांधकामावर अधिक प्रभावी नियंत्रण ठेवता येणार आहे.

# राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त विशेष ग्रामसभा व जनजागृती उपक्रमांचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे / दि. 24 -** भारत सरकारच्या पंचायती राज मंत्रालयाच्या मार्गदर्शनानुसार 'राष्ट्रीय पंचायत राज दिना'निमित्त ठाणे जिल्हा परिषदेच्या 431 ग्रामपंचायतींत विशेष ग्रामसभा व जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. तसेच जिल्हास्तरावर देखील या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

जिल्हा स्तरावरील मुख्य कार्यक्रम बी. जे. हायस्कूल, ठाणे येथे पार पडला, ज्यामध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थित अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, प्रकल्प संचालक श्रीमती छायादेवी शिसोदे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, कार्यक्रम अधिकारी संजय बागुल, ग्राम विकास अधिकारी, तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



**"जिल्हा परिषद ठाणेच्या यशस्वी वाटचालीसाठी सर्वच अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. राज्यपातळीवरील विविध पुरस्कारांचा मान हा त्यांच्या संयुक्त प्रयत्नांचा परिणाम आहे. आपल्या कार्यातून जिल्हा राज्यात अग्रस्थानी राहील, यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करूया."**
**● रोहन घुगे , मुख्य कार्यकारी अधिकारी**

**या विशेष उपक्रमांमध्ये पुढील बाबींचा समावेश होता:**

- ४३१ ग्रामपंचायती ग्रामस्तरावर विशेष ग्रामसभा
- स्वच्छता उपक्रम अंतर्गत कम्युनिटी मोबिलायझेशन
- महिला स्नेही ग्रामपंचायत, स्वामित्व, पेसा, वन हक्क कायदा यासह योजनांचे साहित्य प्रदर्शन
- उत्कृष्ट ग्रामपंचायती, प्रतिनिधी व संस्थांचा सत्कार
- मा. पंतप्रधान यांचे देशाला संबोधनाचे थेट प्रसारण

कार्यक्रमाच्या आधी जिल्हा परिषदेच्या सर्व विभाग प्रमुखांनी एकत्र येऊन स्वच्छता अभियान राबवले, ज्यामध्ये कार्यालय परिसर स्वच्छता उपक्रम हाती घेण्यात आले.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) श्री. प्रमोद काळे यांनी ग्रामपंचायतींना स्वायत्ततेचा अधिकार मिळाल्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमी बदल माहिती दिली. लोकशाही प्रक्रियेतील नागरिकांच्या सक्रिय सहभागाचे महत्त्व प्रास्ताविक करताना अधोरेखित केले.

***पारितोषिक वितरण:***

राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात "माझी वसुंधरा अभियान 4.0 (2023-24)" अंतर्गत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना गौरविण्यात आले. यामध्ये भिवंडी तालुक्यातील काल्हेर, शहापूर तालुक्यातील वासिंद व बाभळे, तसेच मुरबाड तालुक्यातील फांगुळगव्हाण या ग्रामपंचायतींचा समावेश होता. संबंधित ग्रामपंचायतींचे सरपंच, सदस्य आणि ग्रामविकास अधिकारी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या सन्मानामुळे उत्कृष्ट कार्य करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रोत्साहन मिळाले असून इतर ग्रामपंचायतींसाठीही हे एक प्रेरणास्थान ठरले आहे. या कार्यक्रमाद्वारे ग्रामीण स्तरावरील निर्णय प्रक्रियेतील पारदर्शकता आणि ग्रामस्थांचा सहभाग वाढवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

# कल्याण डोंबिवली महापालिकेत महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** महाराष्ट्र राज्याचा ६६ वा स्थापना दिन कार्यक्रम आज महापालिकेत उत्साह संपन्न झाला. महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी महापालिका मुख्यालयात ध्वजवंदन केले. यावेळी राष्ट्रगीत गायन झाल्यावर शासन निर्णया नुसार राज्यगीताची ध्वनिफीत वाजवण्यात आली.यासमयी महापालिकेचे उपायुक्त वंदना गुळवे, अतुल पाटील, प्रसाद बोरकर, संजय जाधव, महापालिका सचिव किशोर शेळके, कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत , शैलेश कुलकर्णी व इतर अधिकारी वर्ग आणि कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी केंद्र शासनाच्या "पंतप्रधान सूर्य घर मोफत वीज योजनेचा" प्रसार आणि प्रचार करण्यासाठी महापालिकेच्या विद्युत विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या माहिती पत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. सौर ऊर्जा ही हरित ऊर्जा असल्याने जास्तीत जास्त नागरिकांनी तिचा वापर करावा या दृष्टिकोनातून जनजागृती करण्याच्या अनुषंगाने हे माहितीपत्रक तयार करून त्याचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी



अभियंता प्रशांत भागवत यांनी दिली.

महापालिकेच्या डोंबिवली विभागातही अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांच्या हस्ते आज ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी उपायक्त रमेश मिसाळ, सहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर , राजेश सावंत, उप अभियंता अजय महाजन, महेश गुप्ते तसेच इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

त्याचप्रमाणे दत्तनगर, डोंबिवली (पूर्व )येथील १५० फुटी ध्वजाचे ध्वजवंदन आज महापालिकेच्या शहर अभियंता अनिता परदेशी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सहाय्यक आयुक्त संजय कुमार कुमावत, उप अभियंता वसईकर, नाखवे व इतर अधिकारी आणि कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.



**"महाराष्ट्राची भूमी ही संतांची भूमी आहे, त्यांचा आदर्श आपण पुढे ठेवला पाहिजे. या वर्षी सविधानाचा अमृत महोत्सव आपण साजरा करीत आहोत. सविधानाच्या मूल्ये, आदर्श प्रत्येक नागरिकाने जतन करायला हवे. ही मूल्ये आपल्या मधे रुजवायला हवीत आणि आपला महाराष्ट्र, भारत देश प्रगती पथावर जाईल यासाठी, राज्याच्या, देशाच्या विकासाठी प्रत्येक नागरिकाने हातभार लावावा असे आवाहन करत आयुक्त अभिनव गोयल यांनी सर्व उपस्थितांना तसेच नागरिकांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या.**

# मेफोड्रेनची तस्करी करताना इराणी महिलेला अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण जवळील आंबिवली इराणी वस्तीमध्ये राहत असलेल्या एका इराणी महिलेला मेफोड्रन या अंमली पदार्थांची तस्करी करताना खडकपाडा पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने बुधवारी शिताफीने पकडले आहे. या महिलेच्या ताब्यातून पोलिसांनी एक लाख १६ हजार रूपयांची एम. डी. पावडर (एम. डी.) जप्त केली आहे. फिजा मनोज इराणी (२९, रा. पाटीलनगर, इराणी वस्ती, आंबिवली) असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. तस्करी, सरकारी कामात अडथळा आणि अनेक गुन्हेप्रकरणी या महिलेवर कोळसेवाडी, खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.

खडकपाडा पोलीस ठाण्याचे अंमली पदार्थ विरोध पथक बुधवारी दुपारी आंबिवली इराणी वस्ती परिसरात गस्त घालत होते. त्यावेळी त्यांना अटाळी आंबिवली रस्त्यावरील ९० फुटी रस्त्याच्या कडेला एक दुचाकी वाहन उभे असल्याचे दिसले. त्या स्कुटीजवळ एक महिला उभी होती.

पोलिसांना हा प्रकार संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी त्या महिलेकडे चौकशी केली आणि तिच्या ताब्यातील स्कुटीची तपासणी केली. स्कुटीच्या आसनाखालील वस्तू ठेवण्याच्या जागेत बंदिस्त केलेली मेफेड्रोनची पावडर आढळून आली. पोलिसांनी तिला तात्काळ ताब्यात घेतले. तिची कसून चौकशी सुरू केल्यावर तिने उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरूवात केली. ही मेफोड्रेन पावडर तिने कोठुन आणली होती. ती पावडर ती कोणाला विकणार होती, याचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे.

गेल्याच आठवड्यात पोलिसांनी आंबिवली पाटीलनगर भागातून अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या इसमाला अटक केली होती. इराणी वस्तीमधील काही गुन्हेगारांकडून शहर परिसरात अधिक प्रमाणात अंमली पदार्थांची तस्करी होत असल्याचा पोलिसांना संशय आहे. त्यामुळे या वस्ती परिसरात पोलिसांची सतत गस्त असते.



# राज्य सरकारच्या विशेष मोहिमेंतर्गत उल्हासनगरच्या मनपा आयुक्त सर्वोत्तम !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** राज्य सरकारच्या १०० दिवसीय कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिम अतंर्गत महाराष्ट्रातील एकुण २९ महानगरपालिकेमधून सर्वोत्तम महानगरपालिका आयुक्त म्हणून ८६.२९ गुणांसह उल्हासनगर महानगरपालिकेने प्रथम क्रमांक पटकावला. तर महाराष्ट्रातील सर्व कार्यालयामधून ८६.२९ गुणासह दुसरा क्रमांक पटकांविल्याची माहिती आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी दिली आहे. उल्हासनगर महापालिका आयुक्त पदी मनिषा आव्हाळे यांची नियुक्ती झाल्यावर, त्यांनी आपल्या कामाची चुनक दाखविली. शहरातील बेशिस्त कारभाराला आळा घालून स्मार्ट पार्किंग, स्मार्ट रस्ते, ऑनलाईन बांधकाम परवाने, नागरिकांच्या तक्रारीचे निवरण, कचरा मुक्त शहर, कार्यालयाचे संगणीकीकरण, कामाचे वाटप, भंगार साहित्य व गाड्याची विल्हेवाट, अवैध बांधकामावर अंकुश, पार्किंग झोन, संकेत स्थळावर अध्यावत माहिती शासनाच्या १०० दिवस कार्यालयीन सुधारणेची मोहीम उपक्रम अंतर्गत यशस्वीपणे राबविली. गुरुवारी सकाळी महाराष्ट्र दिनानिमित्त आयुक्त मनिषा आव्हाळे यांच्या हस्ते महापालिका प्रांगणात झेंडावंदन झाल्यानंतर महापालिकेने पटकाविलेल्या प्रथम क्रमांकाबाबत माहिती दिली.

# पालिका आयुक्तांकडे खंडणीची मागणी ठाण्यातील पत्रकारावर गुन्हा दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या उपायुक्त तसेच मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन विभागातील सक्षम प्राधिकारी मिनल पालांडे यांच्याकडे २५ लाखांच्या खंडणीची मागणी केल्याप्रकरणी एका पत्रकाराविरोधात चितळसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खंडणीची रक्कम देत नसल्याने पालांडे यांच्या मुलीकडे बघण्याची धमकीही त्याने दिली होती. या प्रकरणी पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

सुहास उत्तम शिंदे असे खंडणीचा गुन्हा दाखल झालेल्या पत्रकाराचे नाव असून त्याचे कार्यालय तीन हात नाका येथे आहे. ठाणे येथील पाचपखाडी भागात राहणाऱ्या मिनल पालांडे या ठाणे महापालिकेत उपायुक्त पदावर कार्यरत आहेत. याशिवाय, त्यांच्याकडे ठाणे येथील मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन विभागातील सक्षम प्राधिकारी या पदाचा पदभारही आहे. त्यांच्या या कायदेशीर नियुक्तीवर सुहास शिंदे हा शंका घेत होता आणि त्या संदर्भात तक्रारी तसेच बदनामीकारक अर्ज प्राधिकरणाकडे वारंवार करीत होता.

तसेच त्याने त्यांना नोकरी घालविण्याची धमकी दिली होती. तसेच हा प्रकार थांबविण्यासाठी त्याने मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन विभागाच्या ठाणे कार्यालयातील कार्यकारी अभियंता राजकुमार पवार यांच्याकडे २५ लाखांच्या खंडणीची मागणी केली होती. तसेच मिनल पालांडे यांचे परिचित असलेले मुश्ताक खोकर यांच्याकडे तडजोडीअंती १२ लाख रुपयांची खंडणी मागितली होती. मात्र, खंडणीचे पैसे देत नसल्यामुळे त्यांच्या मुलीकडे बघण्याची धमकी दिली. नोव्हेंबर २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन विभागाच्या ठाणे कार्यालयात हा प्रकार घडला. या प्रकरणी मिनल पालांडे यांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे चितळसर पोलिस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संदर्भात चितळसर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक सुनील वरुडे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी सुहास शिंदे अद्याप अटक नसून त्यांचा शोध सुरू असल्याचे सांगितले.

माझ्या कायदेशीर नियुक्तीवर शंका घेऊन खोटे अर्ज करून बदनामी केली. तसेच पैसे दिले नाहीत म्हणून मुलीकडे बघण्याची धमकी दिली. तसेच माझ्या गाडीचे लोकेशनही काढल्याने माझ्या जिवाला धोका निर्माण झाला होता. याप्रकरणी दिलेल्या तक्रारीनुसार त्याच्याविरोधात खंडणीचा गुन्हा दाखल झाला आहे. त्याने अशाचप्रकारे अनेक अधिकाऱ्यांना त्रास दिला असून त्यांच्याकडूनही आता तक्रारी दाखल होण्याची शक्यता आहे, असे मिनल पालांडे यांनी सांगितले.

# ठाणे जिल्ह्यात आज पासून विशेष स्वच्छता अभियान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे दि. १ मे :** महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून ठाणे जिल्ह्यात "कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू!" या विशेष स्वच्छता अभियानाला १ मे २०२५ रोजी सर्व ग्रामपंचायतींमध्ये मोठ्या उत्साहात सुरुवात करण्यात आली. हा उपक्रम राज्य शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत राबविण्यात येत आहे. या अभियानाचा उद्देश ग्रामस्तरावर सेंद्रिय कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करून गाव स्वच्छ ठेवण्याची सवय निर्माण करणे हा आहे.

## प्रमुख उपक्रम आणि सहभाग:

त्यानंतर गावातील महिलांना निळ्या व हिरव्या डस्टबिनचे वाटप करण्यात आले. त्यानंतर प्रत्यक्षात नाडेप पद्धतीने कंपोस्ट खड्डा भरण्याचा उद्घाटनपर कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी ग्रामपंचायतींमध्ये सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, महिला बचत गट, विस्तार अधिकारी तसेच इतर मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अभियानाचे कालावधी आणि उद्दिष्टे:

या अभियानाचा कालावधी १ मे ते ३० सप्टेंबर २०२५ असून, त्यात खालील टप्प्यांत काम केले जाणार आहे:

- ओल्या कचऱ्याचे संकलन व नाडेप पद्धतीने खत निर्मिती
- ग्रामपातळीवर स्वच्छतेच्या सवयींचा विकास
- पर्यावरण रक्षण आणि पुनर्वापराविषयी जागरूकता
- जनसहभागातून श्रमदान आणि सामूहिक जबाबदारीची भावना

## प्रशासनाची भूमिका आणि आवाहन

ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक प्रमोद काळे यांनी अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व विभागांनी समन्वय साधावा असे आवाहन केले आहे.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागात जैविक खत निर्मिती, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता जनजागृती आणि शाश्वत कचरा व्यवस्थापन साध्य होणार आहे. "कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू!" या अभियानात ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येत आहे.

# विरार : टँकरच्या धडकेत महिलेचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई:** टँकरने दिलेल्या धडकेत एका महिलेचा मृत्यू झाला आहे. बुधवारी सकाळी विरार येथे ही घटना घडली. संजना संदीप राणे (३४) असे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. अपघातानंतर टँकर चालक फरार झाला आहे. संजना राणे ही विरार पूर्वेच्या कोपरी चंदनसार नित्यानंद नगर येथे राहते. बुधवारी सकाळी मुलीचे शैक्षणिक प्रगतीपत्रक आणण्यासाठी शाळेत जाण्यासाठी अजित पारकर यांच्या सोबत मुलीला घेऊन दुचाकीवरून निघाली होती. मात्र विरार पूर्वेच्या बजरंग प्लाझा सोळंकी शाळेच्या समोर भरधाव वेगाने येणाऱ्या टँकरने (एम.एच.४३ यु. ८४३१) दुचाकीला (एम एच ४८ बी. वाय. ३९३२) जोरदार धडक दिल्याने अपघात घडला. या अपघातात दुचाकीच्या पाठीमागे बसलेल्या संजना यांना गंभीर दुखापत होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर टँकर चालक वाहन सोडून पळून गेला आहे.

या प्रकरणी विरार पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com



# विधानभवन येथे महाराष्ट्र राज्य स्थापना दिन साजरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महाराष्ट्र राज्य 66 व्या स्थापना दिनानिमित्त विधानभवनात विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या हस्ते आणि महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे व विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजवंदन सोहळा साजरा झाला. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांचे सनई-चौघडा व तुतारीच्या निनादात पारंपरिक मराठमोळ्या पध्दतीने स्वागत करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी झालेल्या जनआंदोलनातील सर्व नेत्यांच्या त्यागाचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करून या जनआंदोलनात हौतात्म्य प्राप्त झालेल्यांच्या स्मृतीस महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी अभिवादन केले.सभापती प्रा.शिंदे म्हणाले की, महाराष्ट्र हे देशातील एक अग्रगण्य राज्य असून हा लौकिक यापुढेही कायम रहावा यासाठी सर्वांनी कार्यतत्पर रहावे. राज्यातील सर्व जनतेला महाराष्ट्र दिनाच्या तसेच कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या गोळीबारात मृत्यमुखी पडलेल्या पर्यटकांना यावेळी श्रध्दांजली अर्पण केली.ध्वजवंदन सोहळयास महाराष्ट्र विधानमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे, सचिव डॉ.विलास आठवले, सचिव शिवदर्शन साठ्ये, सह सचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी राजेश तारवी, सह सचिव नागनाथ थिटे, उप सचिव सुभाष नलावडे यांच्यासह विधानमंडळाचे अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्य सुरक्षा अधिकारी राजू भुजबळ आणि राखीव पोलीस उपनिरीक्षक अरुणा जॉन्सन बुरकेन यांच्या नेतृत्वाखालील पथकाने यावेळी मानवंदना दिली.

# १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेत महिला व बालविकास सर्वोत्तम विभाग

## गुणवत्तापूर्ण कार्यासाठी तीसहून अधिक प्रशासकीय अधिकाऱ्यांचा गौरव

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले विजेत्यांचे अभिनंदन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून राज्यातील शासकीय कार्यालयांना शिस्त लावणे, नागरिकांची कामे जलदगतीने पूर्ण होणे आणि शासन-प्रशासन व नागरिकांमधील विश्वास वृद्धिंगत होणे या उद्देशाने 100 दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहिम हाती घेण्यात आली होती. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्याचे मूल्यमापन आज जाहीर करण्यात आले. यामध्ये महिला व बालविकास विभाग सर्वोत्तम मंत्रालयीन विभाग ठरला आहे. भारतीय गुणवत्ता परिषद (Quality Council of India) मार्फत या मोहिमेचे मूल्यांकन करण्यात आले. वेबसाईट कार्यक्षमता, कार्यालयीन सोयीसुविधा, तक्रार निवारण व्यवस्था, गुंतवणूक अनुकूलता, नागरिकांसाठी सेवा सुलभता, तंत्रज्ञान वापर अशा दहा निकषांवर आधारित मूल्यमापन करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत सांगितले की , "ही मोहिम म्हणजे केवळ व्यवस्थापन नाही, तर उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि लोकहितासाठी कार्यक्षम प्रशासनाचे प्रतिबिंब आहे. या उत्कृष्ट अधिकाऱ्यांनी इतरांसमोर आदर्श निर्माण केला आहे."

शासनाच्या सर्व 48 विभागांनी 100 दिवसांचा धोरणात्मक बाबींचा कार्यक्रम हाती घेऊन महत्त्वाची नवीन धोरणे, दूरगामी निर्णय व लोकाभिमुख उपक्रमांची आखणी सुरू केली. गेल्या 100 दिवसात या सर्व विभागांनी निश्चित केलेल्या 902 धोरणात्मक उद्दिष्टांपैकी 706 उद्दिष्टे (78%) पूर्णतः साध्य केली आहेत तर उर्वरित 196 उद्दिष्टे पूर्ण होईपर्यंत संबंधित विभाग आपले काम चालूच ठेवतील.

एकूण 48 विभागांपैकी 12 विभागांनी आपली 100% उद्दिष्ट पूर्तता केली आहे तर आणखी 18 विभागांनी 80% पेक्षा जास्त उद्दिष्टे साध्य केली आहेत. अधिक माहिती www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल. या मूल्यमापनात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कार्यालय, अधिकारी यादी पुढीलप्रमाणे, कंसात टक्केवारी दिली आहे.

# कल्याण डोंबिवलीचे क्लीन आणि ग्रीन एनर्जीच्या दिशेने पाऊल

## - केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्यास सुरुवात केल्यानंतर आता कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने शहरांतील रहिवासी सोसायट्यांकडे आपला मोर्चा वळवला आहे. त्याचाच एक भाग म्हणून आजच्या महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधुन विद्युत विभागातर्फे बनवण्यात आलेल्या पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजनेच्या सखोल माहिती पत्रकाचे केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कल्याण डोंबिवली शहरांनी क्लीन आणि ग्रीन एनर्जीच्या दिशेने पाऊले टाकण्यास सुरुवात केल्याची प्रतिक्रिया यावेळी केडीएमसी आयुक्तांनी व्यक्त केली.

देशातील पारंपरिक ऊर्जा स्रोत आणि त्यांच्या मर्यादा लक्षात घेऊन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महत्त्वाकांक्षी सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून पारंपरिक ऊर्जा स्रोतांवरील अवलंबित्व कमी करून अधिकाधिक स्वच्छ आणि हरित ऊर्जेचा वापर करण्यासाठी लोकांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. देशातील अधिकाधिक लोकांनी आपल्या घराच्या किंवा गृहनिर्माण सोसायट्यांच्या छतावर हा सौर ऊर्जाप्रकल्प उभारण्यासाठी केंद्र, राज्य आणि त्यापाठोपाठ आता कल्याण डोंबिवली महानगरपालिका स्तरावर प्रयत्न केले जात आहेत.

या पंतप्रधान मोफत सूर्यघर वीज योजनेची माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचावी म्हणून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांच्या माध्यमातून पंतप्रधान मोफत सूर्यघर योजनेचे एक माहितीपत्रक बनवण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या या सूर्यघर योजनेचा लाभ घेण्यासाठी नियम काय, कोण कोण लाभ घेऊ शकते, कोणाला किती अनुदान मिळेल, बँकेकडून यासाठी किती अर्थसहाय्य केले जाते, त्याची नोंदणी प्रक्रिया काय आहे या सर्व मुद्द्यांची सखोल माहिती या पत्रकात देण्यात आल्याची माहिती कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी दिली.

तर या योजनेअंतर्गत कल्याण डोंबिवलीतील अधिकाधिक लोकांनी आणि गृहसंकुल सोसायट्यांनी रूफटॉप सोलर योजना राबवावी. ज्यामुळे देशातील सौर ऊर्जेमध्ये वाढ होईल आणि हळूहळू आपण क्लीन एनर्जी दिशेने पाऊल टाकू हा त्याचा मुख्य उद्देश असल्याचे केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांनी स्पष्ट केले. कल्याण डोंबिवली शहरात विशेष करून ज्या रहिवासी सोसायट्यांनी आतापर्यंत सोलर लावले नसतील अशा गृहनिर्माण सोसायट्यांपर्यंत पोहोचण्यासाठी विद्युत विभागातर्फे विशेष मोहीम राबवली जाणार असल्याचे सांगत कल्याण डोंबिवलीतील अशा इमारतींचे सर्वेक्षणही करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. जेणेकरून कल्याण डोंबिवली शहर क्लीन एनर्जी आणि क्लीन आणि क्लीन एन्व्हायरमेंटमध्ये पुढाकार घेईल असा विश्वासही आयुक्त गोयल यांनी व्यक्त केला.

# शतदिवसीय कार्यालयीन सर्वेक्षणात उल्हासनगर मनपा आयुक्त सरस




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदभार स्वीकारताच १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहीम हाती घेतली. या मोहिमेचा उद्देश सर्व कार्यालये ऑनलाईन, स्वच्छ, नागरिकांच्या तक्रारीचे तत्काळ निवारण करणे, झिरो पेन्डेन्सी आदी कार्यक्रमाचा समावेश होता. १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाचे भारतीय गुणवत्ता परिषद तर्फे अंतिम मूल्यमापन करण्यात आले. गेल्या शंभर दिवसात राज्य सरकार मधील मंत्र्यांनी काय कामगिरी केली याचं निकालपत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी जाहीर केलीय.

या निकालानुसार वेबसाईट सुधारणा, कार्यालयीन सोयीसुविधा, तक्रार निवारण, सुलभ जीवनमान, गुंतवणुकीस चालना, तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी १० मुद्यांवर उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांची निवड करण्यात आली.१०० दिवसांच्या कार्यक्रमातील निकालात सर्वोत्तम महानगरपालिका आयुक्त म्हणून उल्हासनगर महानगरपालिकेच्या आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी १०० पैकी ८६.२९ टक्के गुण मिळवत पहिला क्रमांक पटकावला आहे.याबाबतची संपूर्ण माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या सोशल मिडियावरती दिली आहे.त्यांनी यासंदर्भात तशी एक पोस्ट शेअर केली आहे.

विकास ढाकणे यांची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपसचिव पदी नियुक्ती झाल्यावर, आयुक्त पदाचा पदभार तात्कालीन अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांच्याकडे सोपविण्यात आला होता.त्यानंतर शासनाकडून पुणे महानगरपालिकेच्या स्मार्ट सिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांची आयुक्त पदी नियुक्ती जाहीर केली होती.विशेष म्हणजे १९९६ साली महानगरपालिकेची स्थापना झाल्यापासून आयुक्त पदावर विराजमान होणाऱ्या मनिषा आव्हाळे ह्या पहिल्याच महिला अधिकारी ठरल्या त्यावेळी त्यांचे सर्वत्र कौतुक झाले होते. आणि आता राज्य सरकारच्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहीमेतील निकालात सर्वोत्तम महानगरपालिका आयुक्त म्हणून १०० पैकी ८६.२९ टक्के गुण मिळवत पहिला क्रमांक पटकावला असल्याने मनिषा आव्हाळे यांच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे उल्हासनगर महानगरपालिकेचा नावलौकिक वाढला असून त्यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# कामगारांच्या हस्ते करण्यात आले झेंडावंदन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : कामगारांच्या सन्मानार्थ आबिटघर ग्रामपंचायतच्या वतीने कार्यालयातील झेंडावंदनाचा मान येथील कामगाराला देऊन त्याच्या हस्ते तिरंगा ध्वज फडकवण्यात आला.

पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यामधील आबिटघर या ग्रामपंचायतीच्या सरपंच साक्षी संतोष साठे या नेहमीच आपल्या कार्यक्षेत्रातील नागरिकांच्या सन्मानासाठी पुढाकार घेऊन विविध संकल्पना राबवत असतात. महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून अबिटघर हद्दीतील औद्योगिक क्षेत्रात सातत्य पूर्ण काम करून आपल्या कामाची छाप पाडून कामगारांचा लौकिक ज्यांच्या माध्यमातून वाढला तसेच कामगारांना देखील स्वतः चा सन्मान राखून समाजात नाव मिळवता यावे

यासाठी कामगारांच्या सन्मानार्थ सरपंच साक्षी संतोष साठे यांनी त्यांच्या अधिकारातील मान येथील जेष्ठ कामगार सतीश (भाऊ) दूंदाराम पाटील यांना दिला होता.

ग्रामपंचायत वतीने सरपंच साक्षी संतोष साठे, उपसरपंच सुप्रिया सुनील पाटील व ग्रामपंचायत अधिकारी संजय शंकर पाटील यांनी प्रथम जेष्ठ कामगार सतीश दूंदाराम पाटील यांचे स्वागत करून सत्कार केला व त्यानंतर सतीश पाटील यांच्या शुभहस्ते झेंडा फडकवण्यात आला. तसेच यावेळी माध्यमिक विद्यामंदिर अबिटघर येथे सरपंच साक्षी साठे यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहन करून महाराष्ट्र व कामगार दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक दिलीप पाटील ग्रामपंचायत सदस्य भरत जाधव, कुलदीप पाटील, धनश्री पाटील, कल्याणी साठे, भावना रायात, निखिल पाटील, स्मिता चिमडा, मनीषा मुकने, कल्पेश आमले तसेच ग्रामस्थ, शिक्षक, विध्यार्थी व ग्रामपंचायत कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# भिवंडी महानगरपालिकेतर्फे महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिन साजरा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : आज संपूर्ण राज्यात महाराष्ट्र दिन साजरा केला जात आहे. १ मे हा दिवस महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिवस म्हणूनही साजरा केला जातो. संपूर्ण राज्यात विविध ठिकाणी साजरा केल्या जाणा-या १ मे महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६६ व्या स्थापना दिनानिमित्त भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेतर्फे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से) यांच्या हस्ते मनपाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या आवारात ध्वजावंदन करुन राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. यावेळी अग्निशमन जवान, पोलिस व सुरक्षा कर्मचारी तसेच मनपा अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थितीत राष्ट्रध्वजास मानवंदना दिली.

आज आपल्या महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६६ वा स्थापना दिन, आजच्या दिवशी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. संयुक्त महाराष्ट्र मिळावा म्हणून १०६ हुतात्म्यांनी आपले बलिदान दिले होते. आज १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से) यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. तदनंतर महानगरपालिका मुख्यालयाच्या आवारातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळा व स्व. इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयच्या प्रवेश द्वाराजवळ हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण केले तर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आश्वारुढ पुतळयास प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से), अतिरिक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके, यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच शहरातील सर्व राष्ट्र पुरुषांच्या पुतळयांस देखील पुष्पहार अर्पण करण्यात आले.

या प्रसंगी अतिरिक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके, उप-आयुक्त (मुख्या.) श्री. विक्रम दराडे, उप-आयुक्त (कर) श्री. बाळकृष्णा क्षिरसागर, शहर अभियंता श्री. जमिल पटेल, कार्य. अभियंता (पा.पु) श्री. संदिप पटनावर, कार्य. अभियंता (विद्युत) श्री. सिध्दीक काझी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. संदिप गाडेकर, सहा. आयुक्त श्री. शैलेश दोंदे, श्री. नितिन पाटील, प्रभाग अधिकारी मकसूद शेख, माणिक जाधव, सुरेंद्र भोईर, गिरीश घोष्टेकर, बाळाराम जाधव व विभाग प्रमुख, कर्मचारी, शिक्षक या प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गार्डियन स्कूलचा आयसीएसई बोर्ड परीक्षेत शंभर टक्के निकाल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : पूर्वेकडील नंदिवली विभागातील गार्डियन स्कूलचा आयसीएसई बोर्ड परीक्षेत शंभर टक्के निकाल लागला. या परीक्षेसाठी बसलेल्या एकूण १३५ विद्यार्थ्यांपैकी ३५ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक, ७० विद्यार्थ्यांनी ७५% पेक्षा अधिक, तर ३० विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला आहे. शाळेचे हे यश फक्त शैक्षणिक परीक्षेपुरते मर्यादित नसून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर आधारित शाळेच्या दृष्टिकोनाचे साध्य केला आहे. गार्डियन स्कूल मध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासाबरोबरच क्रीडा, कला, संवाद कौशल्य, नेतृत्व क्षमता आणि सामाजिक बांधिलकी याबाबतच्या गोष्टींवर बरं दिला जातो. या परीक्षेमध्ये शाळेतून आलेल्या प्रथम तीन क्रमांकामध्ये प्रांजल रेवळे – ९८.५ टक्के, सान्वी जैन – ९८.०० टक्के, तर सोहम गुजर – ९७.८३ टक्के मार्क मिळविले आहेत. शाळेच्या यशामध्ये पालकांचे विश्वासू पाठबळ, शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, आणि विद्यार्थ्यांचा चिकाटीपूर्ण अभ्यास या सर्वांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. विद्यार्थ्यांना दररोज प्रेरणा देणारे वातावरण आणि योग्य वेळी समुपदेशन दिल्यामुळेच हे यश प्राप्त झाले आहे.आम्हाला हे महत्त्वपूर्ण यश गाठण्यासाठी मुख्याध्यापिका शीतल झोपे, उपमुख्याध्यापिका सविता सुजय, समुपदेशक (काउन्सलर) रुतुजा महाडिक, अंजली मसनद, निशा उन्नीक्रिश्नन, सुधा दीक्षित, भारती कुमारी, पल्लवी बाकरे, रेंजू वॉरियर, ज्योती दास, अमित महाराणा, प्रीती देढिया, स्वप्नजा, सोनाली शर्मा या शिक्षवृंदाचे मोलाचे सहकार्य मिळाल्याचे विद्यार्थी सांगतात.




# रायगड येथे महाराष्ट्र राज्य ६६ वा स्थापना दिन मोठ्या उत्साहात संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बोरघर : १ में १९६० रोजी महाराष्ट्राला राज्याचा दर्जा प्राप्त झाला, त्या सोबतच या दिवशी आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. त्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय महाड येथे ध्वज वंदन केले गेले, आणि महत्वाची बाब म्हणजे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ योगेश प्रमिला प्रभाकर बोराळे उपस्थित असुनही तसेच उपप्राचार्य, वरिष्ठ प्राध्यापक असुनही मानवता आणि समानता तत्त्वानूसार कामगार दिनानिमित्त महाविद्यालयाचे वरिष्ठ परंतु अंशतः तत्त्वावर कार्यरत असलेले सुरक्षा कर्मचारी श्री. सोनू पेंढारी काका यांच्या हस्ते ध्वजारोहन करून कामगार दिनाच्या निमित्ताने कामागरांचा सन्मान व बहुमान केला. या पूर्वी देखील प्राचार्य डॉ योगेश प्रमिला प्रभाकर बोराळे यांनी प्राचार्य झाल्या पासून महाविद्यालयतून हो कोणी प्राद्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी स्त्री पुरुष कोणीही निवृत्त होणार असतात त्यांना त्या त्या वर्षातील स्वातंत्र्य दिनी कींवा प्रजासत्ताक दिनी संबंधित प्रध्यापक कर्मचारी मग ते पुरुष असो वा स्त्री, त्यांना त्यांच्या आपल्या प्रदिर्घ सेवेत जो ध्वजारोहण करण्याचा बहुमान मिळाला नाही तो त्यांना निवृत्त होत असताना प्राचार्य डॉ योगेश बोराळे सरानी त्या सर्वांना स्वातंत्र्य दिनी, प्रजासत्ताक दिनी आणि महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिनी ध्वजारोहण करण्याची संधी स्वतः ध्वजारोहण न करता प्राप्त करून देऊन त्यांना सन्मानित केले आणि हा त्यांचा उपक्रम गौरवनिय असा आहे.

आज महाराष्ट्र दिनानिमित्त आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिना निमित्ताने ध्वजारोहण कार्यक्रमा साठी प्राचार्य डॉ. योगेश प्रमिला प्रभाकर बोराळे, उपप्राचार्य प्रा. आनंद पुकले, डॉ. राकेश सोनार, प्रा. एस्. टी. वानखेडे, आणि सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी उपस्थित होते.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024